**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा
मजला, कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११
००१

श्री.उत्तम श्रीपती खंडागळे
ग्लायडिंग केंद्र, सासवड रोड,
हडपसर, पुणे-411 028

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी अनुदेशक,
ग्लायडिंग केंद्र, हडपसर,
पुणे-411 028

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,
ग्लायडिंग केंद्र, हडपसर,
पुणे-411 028

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2652/2011/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.उत्तम श्रीपती खंडागळे यानी राज्य माहिती आयोगाकडे ज्या 'सार्वजनिक प्राधिकरणा' विरुध्द अपील केले आहे, ते प्राधिकरण केंद्रिय माहिती आयोगाच्या

कार्यकक्षेत येत असल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने आवश्यक तर केंद्रिय माहिती आयोग, क्लब बिल्डिंग, ५ वा मजला, ब्लॉक नं.४, जुने जे.एन.यु. कम्पस, नवी दिल्ली -११००६७ यांच्याकडे इंग्रजी अथवा हिंदी भाषेमध्ये अपील करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 24.10.2011**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा
मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११
००१

श्री.संजय परशुराम चव्हाण
द्वारउभारणी उपविभाग क्र.3ब, **अपीलकर्ता**
स्वारगेट, पुणे-411 037

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन,
मंगळवार पेठ, पुणे-411 011

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2661/2011/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शासकीय निवासस्थानाच्या हस्तांतरणाबाबतच्या माहितीचे एकूण 10 मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.संजय परशुराम चव्हाण यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता त्यानी ढोबळ व विस्तृत स्वरुपाच्या माहितीची

मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 2 मधील 'माहिती' च्या व्याख्येत येईल अशीच माहिती-मागणी आवश्यक आहे. श्री.चव्हाण यांनी केलेल्या माहिती-मागणी अर्ज व प्रथम अपील यावर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर)**

**दि :- 24.10.2011** **राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सी.एन.बनकर
विमल विहार, बी-4/12, **अपीलकर्ता**
बिबवेवाडी, पुणे-411 037

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,
ग्रामविकास व जलसंधारण विकास,
मंत्रालय, मुंबई-400 032

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी,
ग्रामविकास व जलसंधारण विकास,
मंत्रालय, मुंबई-400 032

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2600/2011/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामीणभागातील सामान्य सेवा क्रेंद्र योजनेत सहभागी होण्यासंदर्भात | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सी.एन.बनकर यानी राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.बनकर मूळ माहिती मागणी अर्जान्वये नेमकी माहिती न मागता ढोबळ स्वरुपाच्या माहितीची मागणी केली आहे. माहिती मागणी अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विकास, मंत्रालय, मुंबई यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर)**
**दि :-24.10.2011** **राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.राहुल जयवंत हरिभक्त
साई-निवास, बी-5, सुंदरनगर,
**अपीलकर्ता**
कात्रज-कोंढवा रोड, कात्रज,
पुणे-411 046

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा संचालक(माहिती/प्रशासन),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,
मुंबई-400 032

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक(माहिती/प्रशासन),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,
मुंबई-400 032

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2657/2011/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.राहुल जयवंत हरिभक्त यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-24.10.2011**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भास्कर का.गायकवाड
बी/6, एबीसी एम्लॉईज सहकारी हौसिंग सोसायटी,
**अपीलकर्ता**
पवनानगर, चिंचवड, पुणे- 411 033

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रारुपकार-नि-उप सचिव,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय,
मुंबई- 400 032

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रारुपकार तथा अवर सचिव,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय,
मुंबई- 400 032

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2616/2011/पुणे |
| २ | मूळ अर्जान्वये केलेली मागणी :- कागदपत्रांच्या सत्यप्रती मिळणेबाबत. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. भास्कर का.गायकवाड यानी राज्य मुख्य माहिती आयुक्त मुंबई यांच्याकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रारुपकार तथा अवर सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपीलकर्त्यास दिलेले उत्तर योग्य आहे. अपिलीय प्राधिकारी यानी अपीलकर्त्याच्या प्रथम अपिलावर लेखी निर्णय देणे आवश्यक आहे, याची समज उप प्रारुपकार-नि-उप सचिव, विधी न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई डॉ.मंगला मा. ठोंबरे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-24.10.2011**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नितीन उत्तमराव साठे
उत्तम स्मृती बंगला, प्लॉट नं.बी-12,
**अपीलकर्ता**
राजीवनगर सोसायटी, कैलास सुपर मार्केट जवळ,
विमाननगर, पुणे-411 014

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, (मुख्यालय)
अँटी करप्शन ब्युरो, मधु इंडस्ट्रियल इस्टेट, 1ला मजला,
पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, महाराष्ट्र राज्य,
वरळी, मुंबई-400 013

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक,
अँटी करप्शन ब्युरो, मधु इंडस्ट्रियल इस्टेट, 1ला मजला,
पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, महाराष्ट्र राज्य,
वरळी, मुंबई-400 013

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 2612/2011/पुणे |
| २ | मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-<br>अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली | |

| | |
|---|---|
| | नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.नितीन उत्तमराव साठे यानी राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, आणि योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-24.10.2011**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा

मजला,

कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११

००१

श्री.हरिभाऊ नारायण मधे
रा.पाचघर, ता.जुन्नर, जि.पुणे
**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय जुन्नर,
ता.जुन्नर,जि.पुणे

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 263३/2011/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.हरिभाऊ नारायण मधे यानी राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे केलेल्या व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे हस्तांतरित केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 24.10.2011**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा

मजला,

कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११

००१

श्री.शामराव गजानन वड्ड
१३७७, ई वॉर्ड, दत्तगल्ली,
**अपीलकर्ता**
शाहूनगर, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (I),**
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी,**
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९१३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १०.१०.२०११ |
| २ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी,**<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | |

| | |
|---|---|
| | श्री.संजय एस.भोसले<br>**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (I),**<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर<br>श्री.ओमप्रकाश दिवटे |
| | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासंदर्भातील कामकाजाची कागदपत्रे |

## विवेचन

'मला वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणेसंदर्भात कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याने मी आयोगाकडील अपील माघारी घेत आहे', असे अपीलकर्ता श्री.शामराव गजानन वड्ड यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.संजय एस.भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (I), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.ओमप्रकाश दिवटे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ११.१०.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.परशराम गुंडू तराळ
गुरूकृपा पेट्रोलपंपाजवळ, तेरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्यकार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत,
जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८४ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.परशराम गुंडू तराळ
गुरूकृपा पेट्रोलपंपाजवळ, तेरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्यकार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत,
जिल्हा परिषद, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एन.वाय. कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर
विद्यमान-श्री.संजय सिताराम जाधव, तत्कालीन श्री.आर.एम.पोळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पटेल सर्व्हिसिंग सेंटर, तेरवाड यांच्या चालकाच्या ज्या अर्जावर दि.१०.२.२०१० रोजी सुनावणी झाली त्या अर्जाची प्रत व अन्य माहिती मागितली होती. परंतु या अर्जाची प्रत व त्यावरील निर्णय आदी माहिती न देता अन्य तारखांची माहिती, तीही चुकीची, दिशाभूल करणारी व अपूर्ण दिली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीची नोटीस मला मिळाली नाही. त्यामुळे सुनावणी झाल्याचेही चुकीचे व तारखांमध्ये खाडाखोड करून भासविले जात आहे. शासकीय यंत्रणेला त्रास देण्यासाठी अर्ज करीत असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी लेखी निवेदनात म्हटले असले तरी, वस्तुतः तसे नाही. उलट मलाच वारंवार हेलपाटे मारायला लावून अधिकारी हेतूपुरस्सर त्रास देत आहेत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याच्या दि.८.४.२०१० च्या अर्जाला दि.३०.४.२०१० च्या पत्रान्वये उत्तर पाठवून शुल्क कळविले. दि.१२.५.२०१० रोजी त्यानी शुल्क भरल्यानंतर त्याच दिवशी माहिती दिली. कार्यालयाकडे उपलब्ध असलेली कोणतीही माहिती नाकारलेली नाही. संबंधित सर्व्हिस सेंटरबाबत श्री.तराळ यांची तक्रार असून वेळोवेळी त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यात आलेले आहे. हे सेंटर बंद करावे, अशी त्यांची मागणी असून या एकाच विषयासंदर्भात ते सातत्याने तक्रारीचे व माहिती अधिकारातील अर्ज देऊन शासकीय यंत्रणेला नाहक त्रास देत आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. दि.१०.२.२०१० रोजी ज्या अर्जावर सुनावणी झाली त्याची प्रत व त्यावरील निर्णयाची महिती मिळाली नसल्याची अपीलकर्त्याची तक्रार असून याबाबतची नेमकी वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यानी स्पष्ट करणे आवश्यक

आहे. अपीलकर्त्यानी केलेले अन्य भाष्य व नोंदविलेले आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखल घेण्याचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याने विचारणा केल्यानुसार दि.१०.२.२०१० च्या अर्जाबाबतची नेमकी वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळवून जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यानी दि.२९.१०.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.अ.आ.हिरेमठ
नांदणी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकुलसचिव, संलग्नता विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१०३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
प्रतिनिधी श्री.संजय मोहन कुबल

**जन माहिती अधिकारी** तथा उपकुलसचिव, संलग्नता विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर श्री.संजय मोहन कुबल

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

# <u>विवेचन</u>

डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर या कॉलेजमध्ये शिक्षकांना दिलेली मान्यता व ज्यांना मान्यता नाकारली त्याची कारणे याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. शिक्षकमान्यता विद्यापीठ देत असताना स्वतः माहिती न देता त्यानी अर्ज महाविद्यालयाकडे वर्ग केला. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची योग्य दखल घेतली नाही व माहिती अद्याप मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ.अ.आ.हिरेमठ यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

डॉ.हिरेमठ यानी मागितलेली माहिती महाविद्यालयाच्या स्तरावरील असून संबंधित महाविद्यालय हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण'असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. हे महाविद्यालय आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न असून संबंधित अभिलेख त्या विद्यापीठाकडे पाठविण्यात आले असल्यामुळे शिवाजी विद्यापीठाकडून ते देता येत नाहीत. तसेही डॉ.हिरेमठ याना स्पष्ट केलेले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, संलग्नता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर श्री.संजय मोहन कुबल यानी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर हे महाविद्यालय अनुदानित असल्यामुळे आवश्यक ती माहिती त्यानी अपीलकर्त्यास दिली पाहिजे. प्रशासकीय अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव ती नाकारता येणार नााही. जन माहिती अधिकारी

तथा उपकुलसचिव, संलग्नता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यानी आयोगाचे तसे निदेश संबंधित महाविद्यालयाला कळवावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, संलग्नता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यानी दि.२९.१०.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर महाविद्यालयाने माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, संलग्नता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यानी दि. दि.२९.१०.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.१०.२०११**

**प्रत::**प्राचार्य, डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नवनाथ पांडुरंग मुंढे
रूम नं.४६, साठ कोठरी पोलीस लाईन, कसबा बावडा, कोल्हापूर-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त क्र.(II),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५०१ / २०१० / २०११ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नवनाथ पांडुरंग मुंढे
रूम नं.४६, साठ कोठरी पोलीस लाईन, कसबा बावडा, कोल्हापूर-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त क्र.(II), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.ओमप्रकाश दिवटे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर<br>प्रतिनिधी श्री.ओमप्रकाश दिवटे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : कोल्हापूर महानगरपालिकेने पदोन्नती दिलेले ११२ कर्मचारी व ४५ कनिष्ठ लिपिक यांच्या संदर्भातील जातपडताळणी आदीची माहिती मागितली होती. आम्ही शिक्षित असूनही पदोन्नती दिलेली नाही व लिहिता-वाचता न येणाऱ्यांना, तसेच जातपडताळणी न होता अनेकांना पदोन्नती दिली गेली आहे.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून अभिलेखाचे अवलोकन करून कागदपत्रांची मागणी केल्यास प्रती देता येतील, असे त्याना स्पष्ट केले. तसेच कनिष्ठ लिपिक व वरिष्ठ लिपिकांच्या पदोन्नतीविषयीच्या आदेशाच्या प्रती दिल्या असून त्यात अपेक्षित माहिती आहे. शैक्षणिक पात्रता, जातपडताळणी आदींबाबतचे त्यांचे आक्षेप योग्य नाहीत.

संबंधिताना पदोन्नती देण्याचा निर्णय योग्य की अयोग्य, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. मात्र ४५ कनिष्ठ लिपिकांना दिलेल्या पदोन्नतीबाबतची संबंधितांच्या जातीच्या दाखल्यांच्या प्रतीसह अपीलकर्त्यास हवी असलेली माहिती आठ दिवसांत द्यावी. विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असल्यामुळे अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनानुसार संबंधित अभिलेख अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत व त्यानी लेखी मागणी

केल्यास कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून अपीलकर्त्यास पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अपीलकर्ता याना अभिलेख अवलोकनासाठी उपस्थित राहण्याबाबत दोनदा कळवूनही ते आले नाहीत, असे दि.४.१०.२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यानी आयोगाला अवगत केले अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शोभा एस.सावंत
दुसरा मजला, नागेश्वर मंदिरासमोर, १६३, सोमवार पेठ, पुणे-११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण व
विकास योजना विभाग, झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व
विकास योजना विभाग, झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५१+२७४७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शोभा एस.सावंत
दुसरा मजला, नागेश्वर मंदिरासमोर, १६३, सोमवार पेठ, पुणे-११

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.साहेबराव दांडगे

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुधीर पानसरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : सुतारवाडी येथील स.क्र.९ (जुना स.क्र.१११) हिस्सा क्र.६ व ७ या जमिनींच्या संदर्भातील टी.डी.आर.बाबतची माहिती दि.९.८.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. दाखल प्रस्ताव व मान्य प्रस्तावाची संचिका आढळून येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. ७-८ महिन्यानी माहिती मिळाली. बिल्डरला मदत करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या संगनमताने कागदपत्रे दडविली जातात व माहिती दिली जात नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : श्रीमती सावंत यानी याच संदर्भात माहितीच्या अधिकारात यापूर्वीही अर्ज व अपिले केली असून इतर पत्रव्यवहारही केला आहे. त्यांचा अर्ज दि.११.८.२०१० रोजी प्राप्त झाला. आमच्या विभागात शोध घेऊन संचिका न आढळल्यामुळे दि.१६.९.२०१० च्या पत्रान्वये त्याना तसे कळविले व अर्ज अन्य विभागाकडे वर्ग करून माहितीचा शोध घेण्यात आला. त्या विभागाकडून शोध घेऊन प्राप्त झालेली माहिती दि.२१.१.२०११ रोजी देण्यात आली. याच विषयाबाबत अपीलकर्त्याचे अपील क्र.२७४७/२०१०/ पुणे या प्रकरणी दि.१०.५.२०११ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार दि.१९.५.२०११ च्या पत्रान्वये त्याना पुन्हा उत्तर देण्यात आले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी एकाच मागणीसाठी दोन अर्ज व अपिले केली आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे यानी मूळ अर्जास पाच दिवस विलंबाने उत्तर दिले आहे. २००८-२०१० या कालावधीतील कागदपत्रे शोधण्यास असा विलंब लागणे वस्तुतः योग्य नाही. तथापि, टी.डी.आर.प्रकरणातील कागदपत्रांचा शोध घेणे गुंतागुंतीचे असल्यामुळे हा विलंब झाल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे मान्य

करण्यात येत आहे. संबंधित प्रकरणातील सर्व संचिका अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध आहेत. 'प्रस्ताव दाखल झाल्यावर जाहीर नोटीस दिली असणार, म्हणजे प्रस्तावावर तारीख दिली असणार, म्हणून त्याबाबतची माहिती उपलब्ध असणार,'अशा स्वरुपाची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील 'माहिती'ची व्याख्या लक्षात घेता रास्त मानता येणार नाही. मात्र अपीलकर्त्यानी लेखी निवेदनात नमूद केल्यानुसार संबंधित मिळकतीबाबत दि.३१.३.२००९ च्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या टी.डी.आर.बाबतच्या जाहीर नोटिशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने केलेल्या पुढील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास पुरविणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) सुतारवाडी, पाषाण येथील स.नं.९ हिस्सा नं.६ या मिळकतीचा प्रस्ताव खात्याकडे दाखल झाला नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे यानी दि.१९.५.२०११च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविले आहे. मात्र या मिळकतीबाबत दि.३१.३.२००९ च्या वृत्तपत्रामध्ये टी.डी.आर. विषयीची महानगरपालिकेची जाहीर नोटीस प्रसिध्द झाली आहे. या नोटिशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि.५.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १०.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाजीराव कृष्णाजी खुने
मु. पो. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
भातंबरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,
मु. पो. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. बाजीराव कृष्णाजी खुने
मु. पो. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, बार्शी, जि. सोलापूर श्री. व्ही. एस. जगदाळे

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सचिव,<br>भातंबरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,<br>मु. पो. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. दत्तात्रय अमृतराव पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - भातंबरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मु. पो. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर या संस्थेची सन १९९० ते २०१० या कालावधीतील माहिती मागितली होती. सोसायटीच्या पुढील निवडणुकीची तारीख जन माहिती अधिकारी यानी दिली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी-अपीलकर्त्यांच्या अर्जाची आयोगाकडील सुनावणीच्या सूचनेनंतर माहिती झाली. भातंबरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मु. पो. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर या संस्थेला शासनाचे कोणतेही भाग भांडवल अथवा अनुदान मिळत नाही त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तरीही माहिती देण्याची तयारी आहे.

अपिलीय प्राधिकारी - माहिती देण्याचे आदेश तत्कालीन जन माहिती अधिकारी याना दिले होते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांची माहिती देण्याची तयारी आहे. मात्र 'आगामी निवडणुकीची तारीख' निश्चित झाल्याशिवाय देता येणे शक्य नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. देविदास नागेश कुलकर्णी यानी माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीबद्दल खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. गावपातळीवरील गटबाजीतून अपीलकर्त्यानी तक्रार केली असून त्याना आवश्यक

असलेल्या माहितीचे शुल्क त्यानी भरलेले नाही. शुल्क न भरता ते सतत तक्रार करीत आहेत, असा खुलासा तत्कालीन

जन माहिती अधिकारी श्री.देविदास नागेश कुलकर्णी यानी आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दि.२२/७/२०११ च्या पत्रान्वये केला. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, जि. सोलापूर श्री. व्ही. एस. जगदाळे यानी दि. १०/८/२०११ च्या पत्रान्वये तो आयोगाला सादर केला.

भातंबरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मु. पो. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर या संस्थेला शासनाचे कोणतेही भाग भांडवल अथवा अनुदान अशा स्वरुपाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य मिळत नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. तरी ही माहिती देण्यासाठी त्यानी दर्शविलेली तयारी उल्लेखनीय आहे. शुल्क न भरता तक्रार करण्याची अपीलकर्ता श्री. बाजीराव कृष्णाजी खुने यांची कृती योग्य नाही. त्याना आवश्यक असल्यास शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. कोंडीबा गणपती गव्हाणे
मु. पो. खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पोलिस अधीक्षक (ग्रामीण),
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
बार्शी विभाग, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६०/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. कोंडीबा गणपती गव्हाणे
मु. पो. खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
बार्शी विभाग, जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. मारुती बाबासाहेब पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - खाजगी फिर्यादीने दाखल केलेल्या एका गुन्हयाच्या संदर्भातील तपासाबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून दिलेली नाही. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची दखल घेतली नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> - अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती वैराग पोलिस ठाण्याकडील होती. त्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला त्यावेळी संबंधित प्रकरणी तपास चालू असल्यामुळे त्यांच्याकडील माहिती देता आली नाही. संबंधित प्रकरणातील तपासानंतर पोलिस ठाण्याकडे आलेली माहिती देऊ केली असता अपीलकर्त्यांनी अपील केले असल्याच्या कारणावरुन स्वीकारली नाही. अपीलकर्त्यांच्या मागणीतील मुद्दा क्र. १ वगळता अन्य बाबतीत कारणे, अन्वयार्थ, स्पष्टीकरण अशी विचारणा करण्यात आल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार ती 'माहिती' ठरत नाही.

श्री.आर.एच.सस्ते, सहा. पोलिस निरिक्षक, श्री. एस. एस. बारंगुळे, सहाय्यक फौजदार व श्री. आर. वाय. वजनम, तत्कालीन कनिष्ठ श्रेणी लिपिक यानी माहिती देण्याबाबत तत्परतेने कार्यवाही केली नाही. मात्र संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे अपीलकर्त्यांच्या मूळ फिर्यादीत तथ्य नसल्याचे निष्पन्न झाल्यामुळे अपीलकर्ता या प्रकरणी अर्ज करीत आहेत, असे सहा. पोलिस निरिक्षक, सोलापूर श्री. मारुती बाबासाहेब पाटील यानी दि. ९/५/२०११ च्या लेखी निवेदनात म्हटले आहे..

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची तक्रार पूर्णतः व्यक्तिगत स्वरुपाची असून त्यात सार्वजनिक हिताचा कोणताही संबंध नाही. तपास चालू असताना आवश्यक ती माहिती दिली नसेल तर तसे अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक आहे. तसेच तपास पूर्ण होताच तत्परतेने माहिती पुरविणे आवश्यक आहे. याची समज जन माहिती अधिकारी व या संदर्भातील

अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी निवेदनात नमूद केलेले श्री. आर.एच.सस्ते, सहा. पोलिस निरिक्षक, श्री. एस. एस. बारंगुळे, सहाय्यक फौजदार व श्री. आर. वाय. वजनम, तत्कालीन कनिष्ठ श्रेणी लिपिक याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.तुषार बाळासाहेब शिवले
नेताजी चौक, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय,
पुणे उपविभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तुषार बाळासाहेब शिवले
नेताजी चौक, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पुणे उपविभाग, पुणे
विद्यमान-श्री.अरूण रामचंद्र स्वामी, तत्कालीन-यशवंत भिवाजी भुरकुंडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : वारस नोंदीमध्ये फेरफारानुसार आमचा हक्क डावलण्यात आला. त्याबाबतची कारणे व माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी : वारस नोंदीबाबतच्या अपीलकर्त्याच्या तक्रारीबाबत तहसीलदार, हवेली यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली व वस्तुस्थितीचा अहवाल दि.२०.११.२००८ च्या पत्रान्वये तहसीलदार, पुणे यानी सादर केला. त्याची प्रत व अनुषंगिक माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. मूळ तक्रारीच्या संदर्भात महसूल नियमावली अंतर्गत अपील ते दाखल करू शकतात, असेही त्याना कळविले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर कृष्णा कुलकर्णी
११८५ / ख/२, दुसरी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४८ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.ए.गिरी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एस.ए.गिरी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

काही पत्रांबाबत केलेल्या कार्यवाहीसंबंधातील कागदपत्रांच्या सत्यप्रती मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.सुधाकर कृष्णा कुलकर्णी यानी केली होती. ढोबळ मानाने माहितीची ही मागणी

असली तरी संबंधित लिपिक श्री.गजानन राजाराम सूर्यवंशी यानी हा अर्ज व अपीलकर्त्याचे प्रथम अपीलही संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी  यांच्या निदर्शनास आणले नाही. त्यामुळे त्यावर पुढील कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. आयोगाकडील अपिलाच्या सुनावणीच्या सूचनेनंतर शोध घेतला असता ही बाब लक्षात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एस.ए.गिरी यानी केले.

माहितीच्या अधिकारातील अर्ज व अपिले स्वीकारून संबंधित अधिकाऱ्यांना सादर न केल्याबद्दल श्री.गजानन राजाराम सूर्यवंशी यांच्याकडून शास्तीविषयक म्हणण्यासह खुलासा प्राप्त करून घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यानी आयोगाला सादर करावा. तसेच अपीलकर्त्याची ढोबळ स्वरूपाची माहितीची मागणी लक्षात घेता अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन नेमक्या कागदपत्रांची लेखी मागणी अपीलकर्त्यानी केल्यास जन माहिती अधिकारी यानी २५ पृष्ठांपर्यंतच्या प्रती आठ दिवसांत नि:शुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास अद्याप अप्राप्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा  उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यानी आयोगाला २९.१०.२०११ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

कु.प्रकाश पांडुरंग निकम
मु.पो.निकमवाडी, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा पररिषद,
१७, आंबेडकर मार्ग, पुणे -१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा पररिषद,
१७, आंबेडकर मार्ग, पुणे -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३९९ /२०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, आंबेडकर मार्ग, पुणे प्रतिनिधी श्री.शिवाजी पांढरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा पररिषद,
१७, आंबेडकर मार्ग, पुणे श्रीमती सविता फटाले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

डी.एड., सी.ई.टी. परीक्षेच्या स्वत:च्या व अन्य एका उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेच्या प्रती अपीलकर्ता यानी मागितल्या होत्या. महाराष्ट्र राज्य परिषदेच्या तदर्थ समितीच्या ठरावानुसार तपासलेल्या उत्तरपत्रिका या गोपनीय स्वरूपाच्या असल्यामुळे त्यांच्या प्रती देऊ नयेत, असा परिषदेचा निर्णय असल्यामुळे अपीलकर्त्यास तसे कळविले. उत्तरपत्रिकेच्या प्रती देण्याचे आदेश अन्य प्रकरणात राज्य माहिती आयोगाने दिले असून त्याला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, आंबेडकर मार्ग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.शिवाजी पांढरे यानी संबंधित तपशिलासह केले. त्यांचे निवेदन लक्षात घेता उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयापर्यंत प्रस्तुत विषयात पुढील कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १०.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र वसंत कांबळे
घर नं.८१, रि.स.नं.८८१, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना,
साळोखेनगर, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४३५ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे डॉ.एच.एम.भालेराव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एक प्राध्यापक पूर्णवेळ चार्टर्ड अकौटंट म्हणून काम करतात, हे नियमानुसार योग्य आहे काय, अशी विचारणा अपीलकर्ता श्री.राजेंद्र वसंत कांबळे यानी केली होती. त्याना विहित मुदतीत उत्तर दिले. अन्य एका प्राध्यापकांनी हीच माहिती मागितली होती. परंतु माहितीची आवश्यकता नसल्याचे त्यानी नंतर स्पष्ट केले. महाविद्यालयांतर्गत शिस्त पाळण्याच्या संदर्भात कारवाई केल्यामुळे अशा प्रकारचे अर्ज केले जात आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स डॉ.एच.एम.भालेराव यानी केले.

अपीलकर्ता यानी केलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २ मधील व्याख्येनुसार 'माहिती'ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १०.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अरुण वसंत पाटील
मु. पो. पिंपळगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमिसंपादन अधिकारी क्र. १२,
कोल्हापूर विद्यापीठ हायस्कूलसमोर, भवानी मंडप, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अरुण वसंत पाटील
मु. पो. पिंपळगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर
यांचे प्रतिनिधी श्री. शंकराराव लि.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमिसंपादन अधिकारी क्र. १२,
कोल्हापूर विद्यापीठ हायस्कूलसमोर, भवानी मंडप, कोल्हापूर
श्री. शिवाजी त्र्यंबक कादबाने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता-चिकोत्रा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मौजे पिंपळगाव, ता.भुदरगड, जि. कोल्हापूर येथील भूमिसंपादनाबाबत सन १९९६ मध्ये झालेल्या निवाडयाच्या अनुषंगाने खातेदाराने दिलेल्या नोटिशींच्या प्रती आदि माहिती मागितली होती. परंतु माहिती उपलब्ध असताना जाणीवपूर्वक ती लपवून दिलेली नाही. अशीच माहिती अन्य एका खातेदाराने मागितली असता नोटीस उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तरावरुन दिसून येते. (हे खातेदारच अपीलकर्त्याचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते.) दिलेली माहिती चुकीची व उत्तर खोटे आहे.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या नोटिसांची यादी अभिलेखात उपलब्ध नाही. जुने कागदपत्र शोधून अपीलकर्त्यास तसे उत्तर देण्यास विलंब झाला.

अन्य खातेदाराला दिलेल्या उत्तरानुसार संबंधित नोटिसांच्या प्रती अपीलकर्त्यास हव्या असल्यास देता येतील. मात्र अपीलकर्त्यांनी नमूद केलेला निवाडा क्रमांक चुकीचा आहे. त्यानी नमूद केल्याप्रमाणे निवाडा सन १९९६ मधील नसून जुलै १९९९ मधील आहे. त्यामुळे अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार खातेदारांना नोटिसा बजावल्याबाबतची कोणतीही यादी उपलब्ध नाही. मात्र २७ पैकी १५ गटांच्या संदर्भातील नोटिसांच्या स्थळप्रती उपलब्ध असून त्याच्या मागे नोटीस पोहचल्याबाबतच्या संबंधितांच्या स्वाक्षऱ्या घेतलेल्या आहेत. अपीलकर्त्यास हवी असल्यास ती यादी देता येईल.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. संबंधित निवाडयातील उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास हव्या असल्यास अभिलेख अवलोकन करुन प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मेदरअली इक्राम सय्यद
२५२, मौलाली चौक, द.स.बझार, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०७१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. ए.एस.विपत

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. एस.सी.शेलार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. मेदरअली इक्राम सय्यद यानी मक्तेदार असलेल्या एका खाजगी कंपनीच्या संदर्भातील बिले, चेक आदींची जानेवारी २००६ पासूनची माहिती मागितली होती. विस्तृत माहिती असून ती घेण्यासाठी दोनदा त्याना बोलाविले व विहित मुदतीत माहिती दिली. प्रथम अपिलाच्या सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. एस.सी.शेलार यानी केले. ते रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (म), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. ए.एस.विपत यानी नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सिध्देश्वर शिवचलेप्पा झुंजा
मु. पो. करजगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, करमणूक कर शाखा, करमणूक कर विभाग, सोलापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा करमणूक कर अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, करमणूक कर शाखा, करमणूक कर विभाग, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२४४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सिध्देश्वर शिवचलेप्पा झुंजा
मु. पो. करजगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, करमणूक कर शाखा, करमणूक कर विभाग,
सोलापूर यांचे प्रतिनिधी श्रीमती रेखा रामदास वाघमारे

**जन माहिती अधिकारी** तथा करमणूक कर अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, करमणूक कर शाखा,
करमणूक कर विभाग, सोलापूर श्रीमती अरुणा सयाजीराव गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मौजे करजगी ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील श्री बसवराज माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, करजगी येथील शाळेत दि.१५/८/२०१० रोजी झालेल्या कार्यक्रमात स्थानिक केबलवरुन थेट प्रसारण करण्यात आले. त्यावेळी केलेल्या भाषणांची सी.डी, चित्रफीत व अनधिकृत केबल कनेक्शनची माहिती मागितली होती. तहसीलदार, अक्कलकोट यानीही माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ ची माहिती आमच्या कार्यालयाच्या कक्षेतील असून ती दिली. ऊर्वरित मुद्दयांची माहिती तहसीलदार, अक्कलकोट यांच्याशी संबंधित असल्याने अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला.

तहसीलदार, अक्कलकोट - अपीलकर्त्यांना हवी असलेली सी.डी. शाळेशी संबंधित असल्यामुळे शाळेकडे विचारणा केली. त्यानी ती उपलब्ध नसल्याचे कळविले. देऊ केलेली माहिती अपीलकर्त्यांनी स्वीकारली नाही, म्हणून पंचनामा करुन त्यांच्या घरावर डकविली.

जन माहिती अधिकारी  व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. देऊ केलेली माहिती न स्वीकारण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विनोद विष्णुपंत महाडिक
रा. ४५५२/२ महाडिक बंगला, जुना कराड नाका,
पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह संचालक,
साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
भीमा सहकारी साखर कारखाना लि., टाकळी,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह संचालक,
साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
श्री. डी. आर. घोडे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
भीमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी,
ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. एन. एम. यादव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विनोद विष्णुपंत महाडिक यानी भीमा सहकारी साखर कारखाना लि., टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर या कारखान्याबाबतची सन २००० ते २००८ या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली होती. त्याना माहिती देण्यात आली असून निवडणुकीनंतर आता तेच कारखान्याचे अध्यक्ष झाले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, भीमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. एन. एम. यादव यानी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १२.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीपती भिमा मुलादे
३४-३, गणेशनगर, मडकी वस्ती, पुना रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. श्रीपती भिमा मुलादे
३४-३, गणेशनगर, मडकी वस्ती, पुना रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर श्री. उत्तम दिघे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. विजय ढगे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जुलै २००३ मध्ये श्री. शिवलिंगे लक्ष्मण चवलगे यानी उत्पन्नाच्या दाखल्यासाठी दिलेल्या अर्जाची व दाखल्याची प्रत सोबतच्या कागदपत्रांसह मिळावी, अशी मागणी केली होती. परंतु माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या सन २००३ च्या उत्पन्नाच्या दाखल्यासंबंधी माहिती मागितली आहे. दरवर्षी असे एक लाखाहून अधिक दाखले दिले जातात व त्याची उपयुक्तता ६ महिने इतकीच असल्यामुळे त्या संदर्भातील कागदपत्रे एक वर्षापर्यंत जतन केली जातात. त्यामुळे वारंवार शोध घेऊनही ही कागदपत्रे उपलब्ध न झ ााल्यामुळे माहिती देता आली नाही. अपीलकर्त्यास तसे मुदतीत कळविले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १२.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी ज्ञानोबा मोरे
३०१, मिहिर अपार्टमेंट, १६५, डी,
संगमेश्वर कॉलेजच्या मागे, रेल्वेलाईन, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शिवाजी ज्ञानोबा मोरे
३०१, मिहिर अपार्टमेंट, १६५, डी,
संगमेश्वर कॉलेजच्या मागे, रेल्वेलाईन, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
डॉ. पी. आर. कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
श्री. बाबुराव मल्लाप्पा देवरनादगी

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एका कर्मचाऱ्याच्या नेमणुकीसंदर्भातील चौकशीबाबतची माहिती मागितली होती. प्रथम अपील केल्यानंतर शुल्क आकारुन माहिती दिली. ती निःशुल्क देणे आवश्यक होते. दि. ४/८/२०१० व २७/८/२०१० च्या अर्जानुसार मागितलेल्या माहितीबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी दि. १२/१०/२०१० च्या पत्रान्वये शुल्क कळविले व अपूर्ण माहिती दिली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती विजया रोहिदास मस्के या सेवानिवृत्त झाल्या आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने केलेल्या भरतीबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी चालू आहे. याबाबतचा काही तपशील अपीलकर्त्यांनी विचारला होता. तो प्राप्त करुन घेतल्यानंतर पुरविला. मात्र मुळ अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी ७० दिवस विलंबाने उत्तर दिले. तसेच मी पदभार स्वीकारल्यानंतर संपूर्ण माहिती तयार करुन सोबत आणली आहे.

संबंधित प्रकरणातील तपास चालू असल्यामुळे संपूर्ण माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नव्हती, असे मानले तरी उपलब्ध माहिती देण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती विजया रोहिदास मस्के यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार ३० दिवसांच्या विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. ७० दिवस विलंबाने उत्तर देऊनही त्यानी शुल्क कळविणे नियमबाहय आहे. या शुल्काची रक्कम अपीलकर्त्यास परत केली गेली पाहिजे. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती विजया रोहिदास मस्के यानी विलंबाबाबतचा खुलासा शास्तीविषयक म्हणण्यासह सादर करावा, असे आयोगाचे निदेश विद्यमान जन माहिती अधिकारी

श्री. बाबुराव मल्लाप्पा देवरनादगी यानी त्याना कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर डॉ. पी. आर. कुलकर्णी यानी दि. १२/५/२०११ पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती विजया रोहिदास मस्के याना आयोगाच्या आदेशाबाबत अवगत केले. त्यावर सौ. विजया रोहिदास मस्के यानी दि. २०/५/२०११ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे संबंधित विषयाच्या कागदपत्रांची मागणी केली. ती कागदपत्रे सौ. मस्के याना पाठविण्यात आली व काही कागदपत्रे अपूर्ण असल्याचे त्यानी सांगितल्यामुळे त्यानी स्वतः कार्यालयात येऊन नस्तीचे अवलोकन करुन हवी असलेली कागदपत्रे घ्यावीत, असे दि.२४/६/२०११ पासून दि. ६/७/२०११ पर्यंत ४ वेळा रजिस्टर्ड टपालाने त्याना कळविले. परंतु घर बंद असल्याच्या कारणावरुन टपाल परत आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर डॉ. पी. आर. कुलकर्णी यानी दि. ५/९/२०११ च्या पत्रान्वये पूरक कागदपत्रांसह आयोगास कळविले. या बाबी लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती विजया रोहिदास मस्के खुलासा करण्याचे टाळत आहेत, असे दिसून येते. तथापि पुन्हा एकदा त्याना अंतिम संधी देण्यात येत असून त्या मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास शास्तीसह कारवाईस त्या पात्र ठरतील याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांच्या अर्जाला उत्तर देण्यास ७० दिवस विलंब लावल्यामुळे शास्ती का करु नये, याचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती विजया रोहिदास मस्के यानी दि.२९/१०/२०११ पर्यंत अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. वैशपायन स्मृती

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर डॉ. पी. आर. कुलकर्णी यांचेमार्फत आयोगास सादर करावा. त्यानंतरही त्यानी खुलासा न केल्यास ७० दिवसांच्या विलंबाबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार (७० X २५०) १७,५००/- एवढी शास्तीची रक्कम श्रीमती विजया रोहिदास मस्के याना मिळणाऱ्या सेवानिवृत्ती वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही विद्यमान अपिलीय प्राधिकार तथा अधिष्ठाता, डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर डॉ. पी. आर. कुलकर्णी यानी करावी.

३. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी उत्तर न देता विलंब होऊनही अपीलकर्त्यास माहितीबाबत कळविलेले शुल्क नियमबाहय असून ती रक्कम तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती विजया रोहिदास मस्के यानी अपीलकर्त्यास परत करावी व त्याची पोच दि. २९/१०/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावी.

४. विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, डॉ. वैशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर डॉ. पी. आर. कुलकर्णी यानी वरील क्र. २, ३ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन घेऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १०.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजीराव सूर्यभान क्षिरसागर
मु. पो. वैराग, चाटे गल्ली, ता. बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
विशेष प्रकल्प मंडळ, सा.बा.परिसर, विस्तारीत कक्ष, औरंगाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
विशेष प्रकल्प विभाग, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शिवाजीराव सूर्यभान क्षिरसागर
मु. पो. वैराग, चाटे गल्ली, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
विशेष प्रकल्प विभाग, उस्मानाबाद श्री. के. एम. काझी

**शाखा अभियंता -** श्री. व्ही. व्ही. वायचळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - राष्ट्रीय महामार्ग, विभाग उस्मानाबाद अंतर्गत एन. एच. क्र. २११ मध्ये उस्मानाबाद पासून जिल्हा हद्दीपर्यंत (६२ कि.मी.) या रस्त्याबाबतची सन २००२ ते २००७ या कालावधीतील कामांची तपशीलवार माहिती मोजमाप पुस्तिकेच्या छायांकित प्रतीसह मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी कोणतीच माहिती दिलेली नाही. निःशुल्क माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिल्यानंतरही माहिती मिळत नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी दि. २१/८/२००७ च्या अर्जान्वये विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. त्यामुळे कागदपत्रे पाहून पृष्ठसंख्येचा अंदाज घेऊन उत्तर पाठविण्यासही एक महिन्याचा अवधी पुरेसा नव्हता. तरीही सुमारे ७९४० पृष्ठे होत असल्यामुळे रु.१५,८८०/- एवढे शुल्क व नोंदकृत डाक खर्चासाठी रु.१०००/- अशी रक्कम भरण्याबाबत दि. १८/९/२००७ च्या पत्रान्वये कळविले. परंतु पाठविलेले पत्र दि. २५/७/२००७ रोजी - म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार असलेल्या ३० दिवसांच्या मुदतीनंतर मिळाले असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी त्यानी केली व निःशुल्क माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानुसार माहिती तयार केली. अपीलकर्त्यांनी आपण व्यक्तिशः माहिती नेणार असल्याचे नमूद केले होते. परंतु कळवूनही ते माहिती घेण्यास आले नाहीत. वस्तुतः सर्व माहिती जन माहिती अधिकाऱ्यांच्या कक्षेत नव्हती. काही माहिती अन्य उपविभागांकडे होती. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तरतुदीनुसार अर्ज संबंधितांकडे वर्ग करण्यास असलेली ५ दिवसांची

अतिरिक्त मुदत गृहित धरावयास हवी होती. मूळ उत्तर मुदतीत पाठविले असून ५ दिवसांची ही मुदत धरल्यास अपीलकर्त्याला पत्र मिळाल्याची तारीखही मुदतीतच आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत उत्तर पाठविले आहे. ते अपीलकर्त्यास मुदतीत न मिळाल्याच्या कारणावरुन माहिती निःशुल्क देण्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे आदेश सर्व तपशील विचारात घेणारे नाहीत. तथापि त्यांच्या आदेशानुसार काही माहिती निःशुल्क देण्याची व्यवस्था करुन जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. तरीही अपीलकर्त्यांनी माहिती नेलेली नाही, ही बाब योग्य नाही. वस्तुतः अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (९) अन्वये नाकारता येऊ शकते. तसे न करता माहिती देण्याची तयारी जन माहिती अधिकाऱ्यांनी पहिल्या उत्तरापासून दर्शविली आहे. तथापि आता तयार असलेली माहिती अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु अपीलकर्त्यास कळवूनही त्यानी माहिती नेली नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. के. एम. काझी यानी दि. ७/९/२०११ च्या पत्रान्वये कळविले होते, तर आयोगाच्या मौखिक आदेशानुसार माहिती दिलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शिवाजीराव सूर्यभान क्षिरसागर यानी दि.१३/९/२०११ च्या पत्रान्वये केली. अपीलकर्त्यांच्या तक्रारीनंतर आयोगाने केलेल्या विचारणेनंतर दि. २१/९/२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी श्री. के. एम. काझी यानी तपशील पुरविला. दरम्यान सन २००५-०६ व २००६-०७ या दोन वर्षांची २६७३ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यानी शिपायामार्फत पाठवून दिली. आणखी तीन वर्षांची माहिती दिलेली नाही. ती विनामूल्य मिळावी, अशी मागणी करणारे दि.३०/९/२०११ च्या तारखेचे अन्य अपील अपीलकर्त्यांनी आयोगास सादर केले. त्याची दखल घेण्यात येणार नाही. अपीलकर्त्यास ७९४० पृष्ठांच्या प्रती निःशुल्क देण्यासाठी येणारा खर्च शासनाने करणे हा शासकीय

तिजोरीवरील म्हणजे नागरिकां करातून उभा राहणाऱ्या सार्वजनिक निधीवरील ताण आहे. २६७३ पृष्ठांच्या प्रती जन माहिती अधिकारी यानी निःशुल्क दिल्या आहेत, अपीलकर्त्यास व्यक्तिशः हव्या असलेल्या प्रती पुरविण्यासाठी त्याहून अधिक खर्च सार्वजनिक निधीतून करणे समर्थनीय नाही. जन माहिती अधिकारी यानी माहितीसाठीचे शुल्क विहित मुदतीत कळविले असताना व अन्य विभागांकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार अतिरिक्त ५ दिवसांचा कालावधी असल्याचे विचारात घेता माहिती निःशुल्क देण्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे आदेश चुकीचे आहेत. अपीलकर्त्यास २३७३ पृष्ठांची माहिती निःशुल्क मिळाली असून ऊर्वरित माहिती हवी असल्यास अभिलेखाचे अवलोकन करुन व योग्य ते शुल्क भरुन घ्यावी लागेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १२.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र वसंतराव यादव
१७७, रविवार पेठ, अंकुश चौक, कराड, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद,
मंगळवार पेठ, ता.कराड, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, कराड नगरपरिषद,
मंगळवार पेठ, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१०९ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र वसंतराव यादव
१७७, रविवार पेठ, अंकुश चौक, कराड, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, मंगळवार पेठ,
ता.कराड, जि.सातारा श्रीमती अमिता नानासाहेब दगडे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, कराड नगरपरिषद, मंगळवार पेठ,
ता.कराड, जि.सातारा श्री.अल्ताफहुसेन नसिरूद्दीन मुल्ला

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : बेकायदेशीर बांधकामाबाबत वारंवार तक्रार करूनही कारवाई केली जात नाही व त्याबाबतची योग्य माहितीही जन माहिती अधिकारी देत नाहीत.

जन माहिती अधिकारी :अपीलकर्त्यानी दि.३०.७.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती अन्य विभागाकडून संकलित करून द्यावयाची होती. तशी ती संकलित करून दि.४.९.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. याच विषयासंदर्भात अपीलकर्त्यानी वेळोवेळी केलेल्या अर्जांनुसार त्यातील माहिती पूर्वीही दिलेली आहे. आणखी माहिती हवी असल्यास त्यासाठीचे शुल्क भरावे, असेही त्याना त्यावेळी सांगितले होते.

अपिलीय प्राधिकारी : दोन अर्जांद्वारे एकच माहिती अपीलकर्त्यानी मागितली होती व ती मिळाल्याचे त्यानी लेखी नमूद केले आहे. नगरपालिकेच्या अभिलेखानुसार सर्व माहिती दिली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता बेकायदेशीर बांधकामावर कारवाई करण्याची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अन्य माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्ताराम धोंडिबा मोहिते
वॉर्ड नं.२१, घर नं.२२७६, लिंगाडे मळा, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७६ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दत्ताराम धोंडिबा मोहिते<br>वॉर्ड नं.२१, घर नं.२२७६, लिंगाडे मळा, इचलकरंजी,<br>ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>श्री.सूर्यकांत बी.पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : जन माहिती अधिकाऱ्यानी रूपये ८५ शुल्क भरून घेऊन केवळ एका पानाची माहिती दिली. तीही अपुरी आहे.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याच्या मूळ अर्जावर दिनांक नाही. त्यानी विचारलेल्या प्रश्नांना जन माहिती अधिकाऱ्यानी मुद्देनिहाय उत्तर व पूरक कागदपत्राची प्रत पुरविली आहे. माहिती अपुरी नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास जन माहिती अधिकाऱ्यानी मुद्देनिहाय उत्तर व माहिती दिली आहे. मात्र एका प्रतीसाठी ८५ रूपये शुल्क आकारणी योग्य नाही. त्यामुळे एका प्रतीचे नियमातील तरतुदीनुसार शुल्क रूपये २ व झालेल्या टपाल खर्चाची रक्कम वगळता ऊर्वरित रक्कम अपीलकर्त्यास परत करणे आवश्यक आहे. तसे ते करून अपिलीय प्राधिकारी यानी आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यानी दि.५.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १८.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश बाबुराव कोले
घर नं.५४४, सी वॉर्ड, रविवार पेठ, सबजेलसमोर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र
यांचे कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७४ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश बाबुराव कोले
घर नं.५४४, सी वॉर्ड, रविवार पेठ, सबजेलसमोर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय,
ताराबाई पार्क, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.राजकुमार रामचंद्र जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.राजकुमार रामचंद्र जाधव

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा येथे कनिष्ठ श्रेणी लिपिक असताना माझी बदली झाली. परंतु प्राचार्यानी कार्यमुक्त केले नाही. त्याविरुध्द दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याचा दि.२८.१.२०१० चा अर्ज प्राप्त झाला. दि.२०.२.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय पृष्ठसंख्या व शुल्क कळविले. दि.२.३.२०१० रोजी त्यानी शुल्क भरल्यानंतर दि.१०.३.२०१० च्या पत्रान्वये माहिती दिली. बदलीबाबतच्या तक्रारीविषयीच्या कार्यवाहीची त्यांची मागणी प्रशासकीय स्वरूपाची आहे.

जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने संबंधित अन्य कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.३०.६.२०११ च्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजकुमार रामचंद्र जाधव यानी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.१०२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.तुकाराम मारूती वरेकर
डॉ.आंबेडकर वसाहतजवळ, वरेकर मळा, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी गट अ,
जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सौरभ मतिमंद शाळा,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०६ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी गट अ, जिल्हा परिषद, कोल्हापूर
प्रतिनिधी सौ.वृषाली सुरेंद्र शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, सौरभ मतिमंद शाळा,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर कु.रूपाली अर्जुन कोगनोळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता श्री.तुकाराम मारूती वरेकर यानी सौरभ मतिमंद शाळा, जयसिंगपूर, तालुका शिरोळ, जि.कोल्हापूर या शाळेच्या संदर्भातील माहिती समाजकल्याण अधिकारी, गट-अ, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. माहिती शाळेशी संबंधित असल्यामुळे व शाळा अनुदानित असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यानी अर्ज आमच्याकडे वर्ग केला. त्यानुसार माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सौरभ मतिमंद शाळा, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर कु.रूपाली अर्जुन कोगनोळे यानी पूरक कागदपत्रांसह केले. अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट अ, जिल्हा परिषद, कोल्हापूर प्रतिनिधी सौ.वृषाली सुरेंद्र शिंदे यानी त्याला दुजोरा दिला.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग जोती आडसुळे
७१३, ए वॉर्ड, गंजीमाळ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.संजय हि.हेरवाडे

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.संजय शि.भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

कोल्हापूर महानगरपालिकेने अनुशेष भरण्याच्या संदर्भात केलेल्या प्रक्रियेबाबतची व निवड यादी, परीक्षा यादी या संदर्भातील माहिती विहित मुदतीत मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.पांडुरंग जोती आडसुळे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता यांच्या दि.१५.१०.२००९ च्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एन.टी.कांबळे यानी दि.११.११.२००९ च्या पत्रान्वये काही माहिती देणारे उत्तर पाठविले. ते आता सेवानिवृत्त झाले आहेत. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संकलित करून देणे आवश्यक होते. तशी ती देण्यास विलंब झाला. परंतु मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली आहे, अस प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.संजय शि.भोसले यानी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एन.टी.कांबळे यानी विहित मुदतीत अपीलकर्त्यास उत्तर दिले आहे. मात्र माहिती संकलित करण्यास अवधी लागणार असल्याचेही अपीलकर्त्यास कळविणे व कमीतकमी मुदतीत माहिती संकलित करून अपीलकर्त्यास पुरविली जाणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एन.टी.कांबळे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १८.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी आनंदा कापसे
घर नं.२६४६, डी वॉर्ड, जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रबंधक, राज्य ग्राहक वाद निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य,
खोली नं.१ व २, जुने प्रशासकीय महाविद्यालय, हजारीमल सोमानी मार्ग,
सी.एस.टी.समोर, मुंबई उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८५ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.शिवाजी आनंदा कापसे<br>घर नं.२६४६, डी वॉर्ड, जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली<br>श्री.एस.एस.जाधव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली यांच्या अध्यक्षांच्या संदर्भात व दाखल होणाऱ्या प्रकरणांबाबत मागितलेली माहिती मिळाली नाही. माझ्या अर्जाला टपालाने उत्तर पाठविल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे असले तरी ते खोटे आहे. माहिती स्वत: घेऊन जाणार, असे मी अर्जामध्ये म्हटलेले असताना टपालाने माहिती पाठविण्याचे कारण नव्हते.

जन माहिती अधिकारी : तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.आ.म.सावंत यांची नागपूरला बदली झाली आहे. ढोबळ मानाने व सर्वसाधारण कार्यपध्दतीच्या संदर्भात व काही नियमावलीविषयीची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली होती. जिल्हा ग्राहक मंचात अपीलकर्त्यानी दाखल केलेली विविध प्रकरणे असून त्यासाठी ते समक्ष येत असतात. परंतु ते व्यक्तिशः माहिती नेणार होते. तशी त्यानी नेली नाही, म्हणून नंतर यूपीसीने पाठविली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यानी 'माहिती' म्हणून नियमावली, अभिप्राय, अन्वयार्थ अशा स्वरूपाची विचारणा केली आहे, तसेच ग्राहक मंचापुढील काही प्रकरणांबाबत विशिष्ट स्वरूपाचा निकाल देण्याची मागणी केली असून त्याबाबतची मते नोंदविली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत तो येत नाही. त्याना अभिलेखाचे अवलोकन करावयाचे असल्यास जन माहिती अधिकारी अभिलेख उपलब्ध करून देऊ शकतात. परंतु भाष्य, विशिष्ट कृतीबाबतचे नियमानुसार समर्थन, अभिप्राय, ग्राहक मंचापुढील प्रकरणांबाबत विशिष्ट स्वरूपाचे निकाल देण्याची मागणी या बाबी माहितीच्या अधिकारात येत नाहीत. तथापि अपीलकर्त्याच्या अर्जावर माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.आ.म.सावंत यानी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली श्री.आ.म.सावंत यानी दि.५.७.२०११ च्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा त्याच दिवशी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.जाधव यानी आयोगाला सादर केला. अपीलकर्त्याचा

दि.७.९.२००९ रोजीचा अर्ज दि.१४.९.२००९ राजी प्राप्त झाला. ते व्यक्तिशः माहिती नेणार होते. स्वतः व विविध ग्राहकांचे प्रतिनिधी म्हणून ते ग्राहक मंचात सातत्याने येत असतात. तयार करून ठेवलेली माहिती दप्तर पाहणी करून ते व्यक्तिशः नेणार असल्यामुळे पाठविली नाही. मात्र दि.३.१०.२००९ रोजी ती तयार असल्याचे कागदोपत्री नोंद आहे. अपिलीय प्राधिकारी तथा प्रबंधक, राज्य ग्राहक वाद निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य, खोली नं.१ व २, जुने प्रशासकीय महाविद्यालय, हजारीमल सोमानी मार्ग, सी.एस.टी.समोर, मुंबई यांच्यापुढील सुनावणीच्या वेळी त्या पत्रासह माहिती सादर केली व अपीलकर्त्यानी ती स्वीकारून पोहोच दिली. दप्तराची पाहणी कार्यालयीन कामकाजाच्या कोणत्याही दिवशी ते करू शकतील, असे या पत्रात नमूद असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर ते ग्राहक मंचात आले असता त्याना तोंडी सांगूनही व त्यानंतर पत्राद्वारे कळवूनही ते अद्याप अभिलेख पाहणीसाठी आले नाहीत, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.आ.म.सावंत यानी खुलाशात तपशिलवार नमूद केले आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपीलकर्ता यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत समाविष्ट होईल अशीच माहिती मागणे व अभिलेख अवलोकन करावयाचे असल्यास जन माहिती अधिकाऱ्यानी कळविल्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे, याची समज अपीलकर्ता श्री.शिवाजी आनंदा कापसे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राकेश कृष्णराव मंडलीक
१७४८-बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,
करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत दऱ्याचे वडगांव,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६६ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राकेश कृष्णराव मंडलीक
१७४८-बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,
करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर तत्कालीन श्री.रविंद्र सत्याप्पा कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत दऱ्याचे वडगांव,ता.करवीर, जि.कोल्हापूर
विद्यमान-श्री.रायसिंग गोमाजी वळवी, तत्कालीन-श्री.सचिन दिनकर कारखेले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : विशेष घटक योजनेअंतर्गत दऱ्याचे वडगाव, वड्डवाडी येथे झालेल्या पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात माहिती मागितली होती. या योजनेच्या संदर्भात दाखल झालेल्या गुन्ह्यामध्ये आमचा संबंध नसताना आमची नावे गुंतविली. बनावट पध्दतीने प्रकरणात नावे समाविष्ट केली असल्यामुळे माहिती मिळणे आवश्यक असून जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली नाही. सात दिवसात माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी देऊनही ग्रामसेवकानी त्यानुसार पूर्तता केली नाही.

जन माहिती अधिकारी : संबंधित योजना ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या कक्षेतील असून समितीच्या अध्यक्षांनी त्याबाबतचे दप्तर ग्रामपंचायतीकडे दिलेले नाही. सरपंच हे समितीचे अध्यक्ष असून योजनेत अपहार झाल्याबाबत फिर्याद दाखल आहे व गेल्या चार वर्षांपासून पोलीस चौकशी चालू आहे. पोलिसांनीही दप्तर ताब्यात घेतलेले नाही. दप्तर उपलब्ध नसल्यामुळे माहिती देता येत नाही. तसे अपीलकर्त्यास मूळ अर्जावर व अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतरही कळविले आहे.

संबंधित योजना नागरिकांच्या समितीतर्फे राबविली जात असली तरी शासकीय योजनेबाबतची कागदपत्रे समितीने ग्रामपंचायतीला सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रांअभावी माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे रास्त असून प्रस्तुत प्रकरणात पोलीस चौकशी चालू असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या अथवा पोलिसांच्या ताब्यात दप्तर येण्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यानी कागदपत्रे ताब्यात घेण्याबाबत प्रशासकीय कार्यवाही करून अथवा पोलिसांकडे त्याबाबत नोंद करून आयोगाला अहवाल सादर करावा, असे

मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. असा अहवाल अद्याप आयोगाला प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यानी दि.५.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर न केल्यास ते पुढील कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिगंबर लिंगप्पा पोळ
४४७, आंबा रोड, पेठ वडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, वडगाव नगरपरिषद, पेठ वडगांव,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, वडगाव नगरपरिषद, पेठ वडगांव,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिगंबर लिंगप्पा पोळ
४४७, आंबा रोड, पेठ वडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, वडगाव नगरपरिषद, पेठ वडगांव,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.राजन भालचंद्र ढवळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : वडगाव नगरपरिषदेने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविलेल्या निविदांच्या संदर्भात मागितलेल्या माहितीच्या ११३ प्रती असताना रूपये २९० शुल्क भरून घेतले. ते अवाजवी आहे. निविदा क्र.२८ ची माहिती तयार आहे, असे पत्र दिले असतानाही ती माहिती दिली नाही. माहिती अपुरी दिली.

<u>जन माहिती अधिकारी</u> : तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शिवाजी बाबासाहेब पाटील यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत शुल्क कळविले व मुद्देनिहाय माहिती दिली, असे कागदपत्रांवरून दिसून येते.

दिलेली माहिती व शुल्क आकारणी याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शिवाजी बाबासाहेब पाटील यांच्याकडून खुलासा प्राप्त करून घेऊन विद्यमान जन माहिती अधिकारी यानी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, वडगाव नगरपरिषद, पेठ वडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.राजन भालचंद्र ढवळे यानी दि.५.७.२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. काही कागदपत्रे दुबार झाली असल्यामुळे कळविलेल्या शुल्कापेक्षा कमी प्रती देण्यात आल्या असून रूपये ६४ ही रक्कम धनादेशाद्वारे अपीलकर्त्यास परत करण्यात येत आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राजन भालचंद्र ढवळे यानी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शिवाजी बाबासाहेब पाटील यांच्या खुलाशाच्या आधारे नमूद केले आहे. हा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे  पाहता अपीलकर्त्यास सर्व माहिती देण्यात आली आहे, मात्र अतिरिक्त शुल्क त्याच वेळी परत करावयास हवे होते, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्य

लिपिक, वडगाव नगरपरिषद, पेठ वडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी बाबासाहेब पाटील याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेश विठ्ठल लोहार
१३०, वैष्णवी नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा समादेशक अधिकारी,
होमगार्ड कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा प्रशासकीय अधिकारी,
होमगार्ड कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०७०/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजेश विठ्ठल लोहार
१३०, वैष्णवी नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा प्रशासकीय अधिकारी,
होमगार्ड कार्यालय, सोलापूर श्री. जवाहर किसनराव पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - होमगार्ड संघटनेमधील तालुका समादेशक श्री. दिलीप ल. मस्के यांच्या बाबतची माहिती व सन २००४ ते २००९ या कालावधीतील होमगार्डस् हजेरी, भांडार सामुग्री आदिंबाबतची माहिती मागितली होती. 'त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने देता येत नाही', असे उत्तर श्री. दिलीप ल. मस्के यानी त्यांचा काहीही संबंध नसताना दिले. होमगार्डसाठी शासनाने दिलेल्या सामग्रीचे वाटप झालेले नाही, ते बाहेर विकल्याचा पुरावा आहे. परंतु माहिती मिळणे आवश्यक आहे. ती निःशुल्क मिळावी.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी दि. ५/१०/२०११ रोजी दोन अर्जांद्वारे माहिती मागितली. दि. १/११/२०११ रोजी स्मरणपत्र पाठविले व त्याच दिवशी 'त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने देता येत नाही', असे श्री. म्हस्के यानी कळविले. जन माहिती अधिकाऱ्यांना दि. ९/११/२०१० रोजी अर्ज प्राप्त झाल्यावर दि. २०/११/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. सन २००४ ते २००९ या कालावधीतील होमगार्डस्ची हजेरी, साप्ताहिक कवायत इ. अत्यंत व्यापक व विस्तृत स्वरुपाची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून ती संकलित करुन देण्यास विलंब लागेल, असेही त्याना त्याच वेळी कळविले. सदर माहिती मागणीचे प्रयोजन व उद्देश स्पष्ट करण्याबाबत त्याना कळविले. परंतु त्यानी ते केले नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहिती मागणीचे प्रयोजन व उद्दिष्ट याची विचारणा करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी लक्षात घेता नियमबाहय आहे. तसेच ज्या अधिकाऱ्यांची माहिती मागितली आहे, त्यानीच स्वतः

'त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने देता येत नाही', असे नमूद करुन ती देण्याचे नाकारत असल्याचे कळविणे योग्य नाही. मात्र जन माहिती अधिकाऱ्यांनी मुद्देनिहाय उत्तर दिले असून अपीलकर्त्यांनी मागितलेली ५ वर्षांच्या कालावधीतील माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याचे त्यांचे म्हणणे योग्य आहे. तथापि ही माहिती गोपनीय नाही. ती संकलित करण्यास विलंब लागेल, हे मान्य केले तरी एव्हाना ती संकलित झाली असणे अपेक्षित असल्यामुळे १५ दिवसांत अपीलकर्त्यास माहिती पुरवावी. तसेच अधिकार नसताना अपीलकर्त्यांच्या अर्जाला उत्तर दिल्याबाबत श्री. मस्के याना समज द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १५/११/२०११ पर्यंत जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रशासकीय अधिकारी, होमगार्ड कार्यालय, सोलापूर श्री. जवाहर किसनराव पवार यानी आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. कुंडलिक मल्लिकार्जुन मोरे
मु. पो. मोरेवस्ती उपळाई (ठों ), ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९३८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड. कुंडलिक मल्लिकार्जुन मोरे
मु. पो. मोरेवस्ती उपळाई (ठों ), ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. एस. बी. साळे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्रकुमार केशवराव साळुंखे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मु. पो. मोरेवस्ती उपळाई (ठों ), ता. बार्शी, जि. सोलापूर येथील जुन्या ट्रान्स्फॉर्मरच्या जागी नवीन ट्रान्स्फॉर्मर मंजूर झाला. तो बसविताना बेकायदेशीरपणे जागा बदलून ठेकेदाराने स्वतःच्या शेतात नवा ट्रान्स्फॉर्मर बसविला.एका वर्षात चार वेळा तो जळाला. या ट्रान्स्फॉर्मरचा पाहणी नकाशा, मंजुरी क्रमांक, कनेक्शन धारकांची नावे, तारांची चोरी आदि माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती कनिष्ठ अभियंता व तत्कालीन प्रभारी कार्यालयीन कनिष्ठ अभियंता, शाखा कार्यालय, बार्शी श्री. कुणाल अनिल माळवदे यांच्या कक्षेतील असल्यामुळे माहिती देण्याची सूचना त्याना दिली व सुमारे २० स्मरणपत्रे पाठविली. त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही. त्यामुळे माहिती देता आली नाही.

तपशिलासह वरील आशयाचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सादर केले.

संबंधित ट्रान्स्फॉर्मरबाबतच्या तक्रारी व कारवाईची मागणी ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र अधिकृत/अनधिकृत कनेक्शन धारकांची नावे अभिलेख्यातील नोंदीनुसार अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्रकुमार केशवराव साळुंखे यानी ही माहिती पुरवावी. लेखी सूचना व वारंवार स्मरणपत्रे देऊनही श्री. कुणाल अनिल माळवदे यानी

माहिती दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी नमूद केले आहे. माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी जबाबदारी सोपविल्याचे लक्षात घेता श्री. कुणाल अनिल माळवदे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (४,५) नुसार मानीव जन माहिती अधिकारी ठरतात. माहिती देण्यास विलंब झाला असल्यास, माहिती दिली नसल्यास ते शास्तीस पात्र ठरतात. म्हणून संबंधित अधिकारी श्री. कुणाल अनिल माळवदे यांचा माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा शास्तीविषयक म्हणण्यासह खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दंडात्मक कारवाईची जाणीव देऊन जन माहिती अधिकारी यानी श्री. माळवदे याना दि. १३/५/२०११ च्या पत्रान्वये माहिती पुरविण्यास कळविले. परंतु त्यांचा खुलासा अद्याप प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. मु. पो. मोरेवस्ती उपळाई (ठों ), ता. बार्शी, जि. सोलापूर येथील ट्रान्स्फॉर्मरवरील अधिकृत व अनधिकृत कनेक्शन्स धारकांच्या नोंदीनुसार अपीलकर्त्यास यादी देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्रकुमार केशवराव साळुंखे यानी दि. १५/११/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.
३. माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा खुलासा तत्कालीन प्रभारी कार्यालयीन कनिष्ठ अभियंता, शाखा कार्यालय, बार्शी श्री. कुणाल अनिल माळवदे यानी विलंबाच्या कारणासह व शास्तीविषयक म्हणण्यासह दि.१५/११/२०११ पर्यंत

आयोगाला सादर करावा. या मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास त्याना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नागेश अरुण मोरे
मु. पो. मोरेवस्ती उपळाई (ठों ), ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नागेश अरुण मोरे
मु. पो. मोरेवस्ती उपळाई (ठों ), ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. एस. बी. साळे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्रकुमार केशवराव साळुंखे

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मु. पो. मोरेवस्ती उपळाई (ठों ), ता. बार्शी, जि. सोलापूर येथील अतिरिक्त ट्रान्स्फॉर्मरवर बेकायदेशीर विद्युत पंप बसविण्यात आले आहेत. ट्रान्स्फॉर्मरवरील तालुक्यातील अधिकृत व अनधिकृत कनेक्शन धारकांची नावे द्यावीत, अशी मागणी केली होती. तसेच अनधिकृत कनेक्शन धारकांची वीज तोडण्याची कारवाई केली पाहिजे, ती कधी करणार, अशी विचारणा केली होती.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांनी माहितीची-मागणी केलेल्या भागाचे संबंधित अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता व तत्कालीन प्रभारी कार्यालयीन कनिष्ठ अभियंता, शाखा कार्यालय, बार्शी श्री. कुणाल अनिल माळवदे याना वारंवार लेखी सूचना देऊनही त्यानी माहिती सादर केली नाही. तसेच अनधिकृत कनेक्शनवरील कारवाईही केली नाही. पोलिस संरक्षण घेऊन कारवाई करण्यासंबंधीच्या लेखी सूचना देऊनही त्यानी कारवाई केली नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणी श्री. कुणाल अनिल माळवदे हेच जबाबदार आहेत.

श्री. माळवदे याना दि. २५/५/२०१० ते दि. ८/२/२०११ या कालावधीत २० स्मरणपत्रे पाठविल्याच्या तपशिलासह वरील आशयाचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सादर केले.

संबंधित ट्रान्स्फॉर्मरबाबतच्या तक्रारी व कारवाईची मागणी ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र अधिकृत/अनधिकृत कनेक्शन- धारकांची नावे अभिलेख्यातील नोंदीनुसार अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यानी ही माहिती पुरवावी. जन माहिती अधिकारी यानी लेखी सूचना व वारंवार स्मरणपत्रे देऊनही श्री. कृणाल अनिल माळवदे यानी माहिती दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी नमूद केले आहे. माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी जबाबदारी सोपविल्याचे लक्षात घेता श्री. कृणाल अनिल माळवदे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (४,५) नुसार मानीव जन माहिती अधिकारी ठरतात. माहिती देण्यास विलंब झाला असल्यास, माहिती दिली नसल्यास ते शास्तीस पात्र ठरतात म्हणून श्री. कुणाल अनिल माळवदे यांचा माहिती देण्याबाबतची कार्यवाही, विलंबाची/माहिती नाकारण्याची कारणे व शास्तीविषयक म्हणणे यासह खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दंडात्मक कारवाईची जाणीव देऊन जन माहिती अधिकारी यानी श्री. माळवदे याना दि. १३/५/२०११ च्या पत्रान्वये माहिती पुरविण्यास कळविले. परंतु असा खुलासा अद्याप प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

४. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

५. मु. पो. मोरेवस्ती उपळाई (ठों ), ता. बार्शी, जि. सोलापूर येथील ट्रान्स्फॉर्मरवरील अधिकृत व अनधिकृत कनेक्शन्स धारकांच्या नोंदीनुसार अपीलकर्त्यास यादी देण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्रकुमार केशवराव साळुंखे यानी दि. १५/११/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

६. माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा खुलासा तत्कालीन प्रभारी कार्यालयीन कनिष्ठ अभियंता, शाखा कार्यालय, बार्शी श्री. कुणाल अनिल माळवदे यानी विलंबाच्या कारणासह व शास्तीविषयक म्हणण्यासह दि.१५/११/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. या मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास त्याना काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आजीमोद्दिन शहाबुद्दिन मुल्ला
९८७, कसबा मुल्ला गल्ली, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४३९/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एस. जी. आंबेडकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जन माहिती अधिकारी यानी सन २००५ पासूनची कोणतीही माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची सुनावणी घेतली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी व आपल्याला नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. आजीमोद्दिन शहाबुद्दिन मुल्ला यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता यानी अँग्लो ऊर्दू हायस्कूल, बार्शी या प्रशालेतील एका लिपिकाच्या संदर्भात ऑक्टोबर २००६ पासूनची माहिती व त्या अनुषंगाने अन्य अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यास झ ाालेल्या विलंबाची कारणे इ. व मूळ अर्जातील माहिती प्रस्तुत अपिलात मागितली होती. शाळेकडून माहिती मिळणे शक्य असल्याचे, तसेच अपीलकर्ता त्याच शाळेत शिपाई असून सातत्याने माहिती मागत असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी नमूद केले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री. एम.जी.आंबेडकर यानी केले.

अपीलकर्त्यांनी मूळ अर्जात अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून प्रस्तुत अपिलातील अर्जात केलेली कारणांची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार 'माहिती' ठरत नाही.

जन माहिती अधिकारी यानी संबंधित प्रशालेकडून स्वत: समक्ष अभिलेख उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्त्यास माहिती पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अहवाल सादर करण्यात न आल्यामुळे आयोगाने जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सोलापूर, श्री. मुजावर मदालानी याना दि. २७/९/२०११ रोजी ताकिद दिली. आयोगाचे आदेश अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून न कळल्यामुळे पूर्तता करता आली नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. मुजावर मदालानी यानी

नमूद केले व दि. ४/१०/२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. अपीलकर्ता श्री. आजीमोद्दिन शहाबुद्दिन मुल्ला व संस्था यांच्यातील वाद सन २००७ च्या आदेशाने मिटला असून संबंधित प्रशालेत प्रत्यक्ष जाऊन अपीलकर्त्यास कार्यालयातील संचिकांमधील उपलब्ध माहिती देण्यात आली. सन २००६ मधील माहिती उपलब्ध नसल्याने देता येणार नसल्याचे स्पष्ट केले, असे त्यानी अहवालात नमूद केले आहे. श्री. मुल्ला यांचा उद्देश संस्थेला व कार्यालयाला त्रास देण्याचा आहे व भेटीच्या वेळी ते तसे बोलूनही दाखवितात, असेही त्यानी अहवालात म्हटले आहे. काही मुद्दयांची माहिती मिळत नसल्याचे अपीलकर्त्यांनी पोहच देताना नमूद केले आहे. परंतु उभय बाजूंनी सादर केलेली पत्रे व जन माहिती अधिकारी यांचा खुलासा विचारात घेता माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सोलापूर, श्री. मुजावर मदालानी यानी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर बापू शिनगारे (धनगर)
मु. पो. रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती हातकणंगले, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकस अधिकारी,
ग्रामपंचायत रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३/९/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शंकर बापू शिनगारे (धनगर)
मु. पो. रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दि. २३/८/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. म्हणून पुन्हा दि. १३/९/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीसही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. परंतु सुनावणीचे पत्र प्राप्त न झाल्यामुळे सुनावणीस उपस्थित राहता आले नाही, असा खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. एम. आर. पाटील व अपिलीय प्राधिकारी श्री. एस.ए.भोईटे यांनी केला.

सरकारी गावठाणामधील अतिक्रमण काढण्याचा आदेश गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यानी दि. ५/१/२०१० रोजी दिलेला होता. परंतु जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री. एस.पी.लोंढे यांचे आर्थिक गैरव्यवहार उघड होऊ नयेत, म्हणून अतिक्रमण काढले जात नाही. त्या बाबतच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही व माहितीच्या अधिकारात मागितलेली माहितीही दिली जात नाही. दि. २७/४/२०१० च्या अर्जान्वये गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशावरील कार्यवाहीबाबत माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले नाही व माहितीही दिली नाही. जन माहिती अधिकारी यानी मुदतीत माहिती दिली नाही, ही गंभीर बाब आहे, असे नमूद करुन ४ दिवसांत निःशुल्क माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले होते. परंतु तरीही ग्रामविकास अधिकारी श्री. एस. पी. लोंढे यानी माहिती दिली नाही. म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. शंकर बापू शिनगारे (धनगर) यानी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. पी. लोंढे यानी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. श्री. शंकर बापू शिनगारे (धनगर) याना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा शास्तीविषयक म्हणण्यासह तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री. एस. पी. लोंढे यानी दि. १५/११/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्यानंतर शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल. या मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. पी. लोंढे याना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री. एम. आर. पाटील यानी अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क पुरवून दि. १५/११/२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीकांत भाऊ शिरगुप्पे
१६/१३९९ आण्णा रामगोंडा पाटील शाळेमागे,
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अधिकारी,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१४/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. श्रीकांत भाऊ शिरगुप्पे
१६/१३९९ आण्णा रामगोंडा पाटील शाळेमागे,
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अधिकारी,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि. कोल्हापूर श्री.नितीन नानासाहेब देमाणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,

| | |
|---|---|
| | इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि. कोल्हापूर श्री.बापूसाहेब अ.चौधरी |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - आण्णा रामगोंडा पाटील शाळा, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर या शाळेमागील बेकायदेशीर मशिदीच्या बांधकामाचा पंचनामा व त्यावरील कारवाई याबाबतची माहिती मिळत नाही. पोलिस स्टेशनकडे माहिती मिळेल असे जन माहिती अधिकारी यानी कळविल्यामुळे पोलिसांकडे माहिती मागितली असता त्यांनीही दिली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- संबंधित मशिदीच्या बेकायदेशीर बांधकाम प्रकरणी शिवाजीनगर पोलिस स्टेशन, इचलकरंजीमार्फत संबंधिताविरुध्द न्यायालयात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बांधकामाबाबतचे अभिलेख या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस स्टेशन येथे सादर करण्यात आले असल्यामुळे माहिती देता येत नाही, असे कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अर्ज शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांच्याकडे वर्ग केला.

संबंधित माहिती देण्याबाबत पोलिस निरीक्षक, शिवाजीनगर पोलिस स्टेशन, इचलकरंजी यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शास्तीविषयक म्हणण्यासह ७ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे अपिलीय प्राधिकारी यानी पोलिस निरीक्षक, शिवाजीनगर पोलिस स्टेशन, इचलकरंजी याना कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि. कोल्हापूर श्री.नितीन नानासाहेब देमाणे यानी दि. २९/६/२०११ च्या पत्रान्वये पोलिस निरीक्षक, शिवाजीनगर पोलिस स्टेशन, इचलकरंजी

याना तसे कळविले असून अद्यापही त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला नाही, याची गंभीर दखल घेण्यात येत आहे. माहिती मिळाली की नाही, हे अपीलकर्त्यांनीही कळविलेले नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि. कोल्हापूर श्री.नितीन नानासाहेब देमाणे यानी दि. २९/६/२०११ च्या पत्रान्वये आयोगाचे आदेश कळवूनही अहवाल सादर न करण्याबाबतच्या खुलाशासह व शास्तीविषयक म्हणण्यासह अहवाल पोलिस निरीक्षक, शिवाजीनगर पोलिस स्टेशन, इचलकरंजी यानी दि. १५/११/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावे. या मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास त्याना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन पुढील कार्यवाही केली जाईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. म. अली गुलाम दस्तगीर दफेदार
५६१, उत्तर सदर बझार, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी,
एल-२२९, उत्तर सदर बझार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. म. अली गुलाम दस्तगीर दफेदार शिक्षण करुन करुन
५६१, उत्तर सदर बझार, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी.आंबेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी,
एल-२२९, उत्तर सदर बझार, सोलापूर श्री. ए. मजिद शेख

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेकडे वारंवार अर्ज करुनही कोणतीही माहिती दिली जात नाही. संस्थेविरुध्द माझा न्यायालयात वाद असल्यामुळे मला माहिती मागण्याचा अधिकार नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले.

<u>जन माहिती अधिकारी</u> - अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती २० वर्षांपूर्वीची आहे. दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेचे बरेच रेकॉर्ड दोन वर्षांपूर्वी गहाळ झाले किंवा हरवले आहे. ज्याच्या ताब्यात हे रेकॉर्ड होते त्यांचे अपघाती निधन झाले असल्यामुळे शोधूनही कागदपत्रे न सापडल्यामुळे माहिती देता आलेली नाही. 'संस्था सुरु झाल्यापासून' अशा स्वरुपात अत्यंत विस्तृत माहिती अपीलकर्त्यांनी मागितली आहे. अपीलकर्त्यांचे व संस्थेच्या व्यवस्थापनाचे न्यायालयात दावे असून मुंबई उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहे. न्यायालयीन वादाबाबत व्यवस्थापनावर दबाव आणून स्वतःच्या फायद्याची तडजोड करुन घेण्यासाठी अपीलकर्त्यांचा प्रयत्न असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा दुरुपयोग करीत आहेत. माहिती मागण्याचा अधिकार त्याना नाही, असे उत्तर त्याना दिलेले नाही.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> - दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेचे अध्यक्ष सध्या परदेशी गेले आहेत. माहिती देण्याबाबत आम्ही संस्थेशी पत्रव्यवहार केला होता. परंतु कागदपत्रांचा शोध घेण्यात येत असल्याचे व संस्थेचे दप्तर उपलब्ध नसल्यामुळे कागदपत्रे देण्याबाबत वेळोवेळी कळवू नये, असे उत्तर दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेने पाठविले.

संस्थेची कागदपत्रे गहाळ झाली / हरवलेली असल्यामुळे त्याबाबतची फिर्याद संस्थेने पोलिसांकडे नोंदविली काय, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच संस्थेच्या दप्तरी माहिती असूनही दिली जात नाही, असे अपीलकर्त्यांचे म्हणणे आहे. ते लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी यानी सक्षम प्रतिनिधी संस्थेत पाठवून कागदपत्रांची तपासणी करावी व आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आयोगाच्या आदेशानुसार शिक्षणाधिकारी यानी प्रशालेला भेट दिली असता मुख्याध्यापक यानी सदरची माहिती संस्थेकडे असल्यामुळे आपल्याशी संबंधित नसल्याचे कळविले व संस्थेचे संस्थापक/सचिव या प्रकरणी माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत. म्हणून संबंधित संस्थेचे संस्थापक/सचिव यांचेवर दंडात्मक कारवाई करावी, असा अभिप्राय देणारा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी. आंबेडकर यानी दि. १३/९/२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू असल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष/सचिव यानी माहितीबाबतची कार्यवाही स्पष्ट करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे गहाळ झाली / हरविली असल्यास त्याबाबतची फिर्याद नोंदविली आहे काय, नसल्यास कागदपत्रांबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे, याचा खुलासा दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यानी दि. १५/११/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. अपिलीय प्राधिकारी श्री. एम. जी. आंबेडकर यानी दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेचे अध्यक्ष/ सचिव यांच्याकडे सक्षम प्रतिनिधी पाठवून अपीलकर्त्यांना

हव्या असलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने संस्थेच्या दप्तराचे अवलोकन करावे, व अपीलकर्त्यास हवी असलेली माहिती त्यात असल्यास अपीलकर्त्यास पुरवून आयोगाला तसा अहवाल दि. १५/११/२०११ पर्यंत सादर करावा. उक्त संस्थेचे अध्यक्ष/सचिव यानी अशा प्रकारे अवलोकन करु न दिल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. धनंजय मच्छिंद्र नागणे
मु. पो. केम, ता. करमाळा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०७२/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. धनंजय मच्छिंद्र नागणे
मु. पो. केम, ता. करमाळा, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर श्री. आण्णासाहेब बाबू बंडगर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - चार व्यक्तींनी माझ्याविरुध्द केलेल्या तक्रारीवरील कार्यवाही व त्या संदर्भात त्यांचा व माझा जबाब याची माहिती पोलिस निरीक्षक, करमाळा यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्ज वर्ग न करता वरिष्ठ कार्यालयाकडून माहिती घेण्यास त्याच अर्जावर लिहून दिले, म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी, करमाळा या वरिष्ठ कार्यालयाकडे अपील केले. त्यानी कळविलेले शुल्क भरल्यानंतरही जबाबाच्या प्रतींसह माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांचा प्रथम अर्ज दि. १०/११/२०१० रोजी प्राप्त झाला. मी माहिती अधिकारी असल्याने माहितीच्या अधिकारातील अर्ज स्वीकारुन करमाळा पोलिस ठाण्याकडून माहिती मागवून शुल्क कळविले व त्यानी शुल्क भरल्यानंतर रजिस्टर टपालाने माहिती पाठविली. अपीलकर्ता म्हणतात तसे जबाब संबंधित प्रकरणात घेणे आवश्यक नसते. त्यामुळे जबाब घेतलेले नाहीत. त्यामुळे त्याची प्रत देता येत नाही. तसे त्याना तोंडी कळविले व लेखीही स्पष्ट केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता माहितीबाबत जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र पोलिस निरीक्षक, करमाळा यानी संबंधित अर्ज स्वीकारुन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, करमाळा यांच्याकडे वर्ग करणे आवश्यक होते, किंवा माहिती त्यांच्याच कक्षेतील असल्याने माहिती देऊन तसे जन माहिती अधिकाऱ्यांना कळविणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे स्वरुप लक्षात घेता अधिक योग्य ठरले असते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल दगडू सगरे
मु. पो. सौदरे, ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३०/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एस. जी. आंबेडकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

'अनुकंपा योजनेखाली नोकरी मिळण्याबाबतच्या अटी व आपल्या अर्जावर जो निर्णय घेण्यात येणार आहे त्या संबंधीच्या टिप्पणीसह कागदपत्रे' अशी माहिती अपीलकर्ता श्री. सुनिल दगडू सगरे यानी मागितली होती. ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि अपीलकर्त्यास मागणीच्या अनुषंगाने कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास संबंधित प्रशालेतील अभिलेख अवलोकन स्वतःच्या उपस्थितीत करु देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी यानी करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानंतर सिल्व्हर ज्युबिली प्रशाला, बार्शी, जि. सोलापूर येथे समक्ष भेट देऊन अपीलकर्ता याना हवी असलेली माहिती पुरविली असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एस. मुजावर यानी दि. ४/१०/२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. संबंधित माहिती मिळाल्याची अपीलकर्त्याची पोहचही त्यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप गणपत राणे
मु.पो.कारीवडे, पो.आर.एच.ई.वर्क्स, राधानगरी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय
कोल्हापूर, कसबा बावडा, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय
कोल्हापूर, कसबा बावडा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर, कसबा बावडा, जि.कोल्हापूर श्रीमती संगीता तावदारे-चव्हाण | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

'राधानगरी येथील महालक्ष्मी तलाव क्षेत्रामध्ये गेलेल्या जमिनीची व सन १९७३ मध्ये पन्हाळा तालुक्यात देण्यात आलेल्या जी.आर. व नोटिशीची माहिती' मिळण्याची मागणी

अपीलकर्ता श्री.दिलीप गणपत राणे यानी केली होती. संबंधित अर्ज पुनर्वसन खात्याशी संबंधित असल्याने तहसीलदार, पुनर्वसन यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून तसे अपीलकर्त्यास कळविले आहे. राधानगरी धरणातील बुडिताखालील गेलेल्या जमिनीची माहिती आमच्या कार्यालयाशी संबंधित नाही. तसेच अपीलकर्त्याचा कोणताही अर्ज आमच्या कार्यालयाकडील अभिलेखामध्ये आढळून येत नाही, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), कोल्हापूर श्री.संजय तेली यानी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यानी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात तहसीलदार, पुनर्वसन यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, माहिती पुरविलेली नसल्यास कारणे व शास्तीविषयक म्हणणे यासह आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर, कसबा बावडा, जि.कोल्हापूर यानी तहसीलदार, पुनर्वसन याना कळविल्याचे पत्र आयोगाला सादर केले. मात्र तहसीलदार, पुनर्वसन, जि.कोल्हापूर यांचा खुलासा आयोगाला अद्याप प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे. दि.१५.११.२०११ पर्यंत त्यानी खुलासा आयोगाला सादर न केल्यास ते पुढील करवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रशांत प्रभाकर जाखलेकर
१४७/२, रेल्वेलाईन, धनशीला को.ऑ.हौ.
सोसायटी (काडादी चाळ) सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
१. मुख्याध्यापक, हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर
२. उप शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रशांत प्रभाकर जाखलेकर
१४७/२, रेल्वेलाईन, धनशीला को.ऑ.हौ.सोसायटी (काडादी चाळ) सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर
प्रतिनिधी श्री.एम. एस. मुजावर

**जन माहिती अधिकारी** तथा
(१) मुख्याध्यापक, हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. अरूण ध.उपाध्ये
(२)उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर
विद्यमान श्री.एम. एस. मुजावर, तत्कालीन श्री.एस.के.सगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी संबंधित प्रशालेचे मुख्याध्यापक उपस्थित नसल्यामुळे व माहिती न मिळाल्याची अपीलकर्त्याची तक्रार असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२७.९.२०११ रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर या शाळेतील तुकड्या, पटसंख्या, प्रगत-अप्रगत विद्यार्थ्यांची वर्गवारी इ. स्वरूपाची सन २००४ पासूनची माहिती शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्यानी अर्ज शाळेकडे वर्ग केला. शाळेने योग्य माहिती न दिल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. त्यावेळी पूर्ण माहिती शाळेने द्यावी, असे ठरले होते. परंतु तरीही मूळ अर्जातील मुद्दा क्र.१०, ११, १२ व १३ यातील पूर्ण माहिती शाळेने दिली नाही. शाळेत पाचवीच्या काही विद्यार्थ्यांना ड श्रेणी दिली असून जे उत्तीर्ण व्हावयास हवे होते त्यांना अनुत्तीर्ण केले आहे. त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. त्यात माझ्या पाल्याचाही समावेश आहे. या अनुषंगाने माहिती न मिळाल्याबद्दल नुकसानभरपाई मिळावी.

यात सामाजिक हिताचा कोणता विषय आहे, अशी विचारणा आयोगाने केली असता समाजासाठीच मागणी केली असल्याचे प्रतिपादन अपीलकर्त्यानी केले.

<u>जन माहिती अधिकारी</u> : अपीलकर्त्याना समक्ष माहिती दाखवावी, असे विस्तार अधिकाऱ्यानी कळविले होते. त्यानुसार अभिलेख अवलोकनासठी बोलाविले असता अपीलकर्ता

आले नाहीत. त्यानी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरूपाची व चार वर्षांपूर्वीच्या वेळापत्रका-सारखी जी कागदपत्रे ठेवली जात नाहीत त्याचीही  आहे. तसेच काही मुद्दयांमध्ये त्याना खुलासा अपेक्षित आहे. तरीही मुद्देनिहाय उत्तर पाठविले.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यानी जन माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अर्ज केला होता. तो शाळेकडे वर्ग करण्यात आला. अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती त्यानी मागितली असून त्याना हवे असल्यास पुन्हा अभिलेख अवलोकन करू देऊन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दि.३.१०.२०११ रोजी देण्यात येतील.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी योग्य जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केलेला नाही. तरीही शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर यानी शाळेकडे अर्ज वर्ग केल्यानंतर व सुनावणीतील निर्णयानुसार शाळेने माहिती दिली. परंतु अपीलकर्त्यानी अत्यंत विस्तृत व तयार करून देणे आवश्यक असलेली अशा स्वरूपातील माहिती मागितली आहे. विद्यार्थी उत्तीर्ण-अनुत्तीर्ण होण्याबाबतची त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही. अशा स्वरूपाच्या माहितीच्या मागणीबाबत सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.६४५४/२०११, दि.९.८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयातील पुढील मार्गदर्शक अभिप्रायाकडे अपीलकर्त्याचे लक्ष वेधण्यात येत आहे.

Indiscriminate and impractical demands or directions under RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counter-productive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the

executive getting bogged down with the non-productive work of eollectingand furnishing information.

The Act should not be allowed to be misused or abused, to become a tool to obstruct the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to do their duty. The nation does not wand a scenario where 75% of the staff of public authorities spends 75 % of their time in collecting and furnishing information of applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and the pressure of the authorities under the RTI Act should not lead to employees of the public authorities prioritizing 'information Furnishing', at the cost of their normal and regular duties.

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक, हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर यानी शाळेतील संबंधित अभिलेख अवलोकनासाठी अपीलकर्त्यास उपलब्ध करून द्यावेत व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.३.१०.२०११ रोजी कार्यवाही करून अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी संयुक्तरीत्या निवेदन आयोगाला सादर केले. 'काही माहिती द्यावयाची राहिल्यास समन्वयाने देणे-घेणे ठरले,' असे अपीलकर्त्यांनी त्यात नमूद केले आहे. मात्र ही प्रक्रिया कायमस्वरूपी चालणे

अपेक्षित नाही. मूळ अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीपुरतीच ती मर्यादित असेल, याची समज उभय बाजूंना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रभाकर कृष्णात माने
९६, भोपळे नगर, मजरेवाडी, पो. शिवशाही,
सोलापूर - ४१३ २२४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९४३/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रभाकर कृष्णात माने
९६, भोपळे नगर, मजरेवाडी, पो. शिवशाही, सोलापूर - ४१३ २२४

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.आर.सी.कोळी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सोलापूर शहरामधील सिध्देश्वर मंदिराजवळील शहाजोर दर्ग्याबाबतच्या इनाम जमिनीच्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती व माहिती मागितली होती. सन १२०० पासून हा दर्गा असून त्याच्या जमिनीबाबतच्या नोंदींच्या प्रती मिळाल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, उत्तर सोलापूर यांच्याकडे वर्ग केला होता व त्यानी विहित मुदतीत अपीलकर्त्यांना उत्तर दिले. अपीलकर्त्यांनी सनदेबाबतचा क्रमांक, दिनांक इ. तपशील पुरविल्यास अधिक शोध घेता येईल, असेही त्याना कळविले होते. त्यांनी मागितलेली माहिती सुमारे ८०० वर्षांच्या काळाशी संबंधित आहे. त्याबाबतचे एक रजिस्टर सापडले. दुसरे रजिस्टर उपलब्ध होत नसल्यामुळे संपूर्ण माहिती देणे शक्य झाले नाही.

जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर /यानी अर्ज वर्ग करण्यासह पुढील कार्यवाही केली असली तरी अपीलकर्त्याना माहिती देण्याच्या दृष्टीने तहसीलदार, उत्तर सोलापूर व नगर भूमापन अधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बोलावून अपीलकर्त्यांच्या शंकांचे निरसन करण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान प्रयत्न करण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर श्री. सुरेश द. जाधव यानी लेखी निवेदनाद्ववारे नमूद केले.

अपीलकर्त्यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना माहिती न देण्याबाबत दोषी धरता येणार नाही. तथापि सर्व

अभिलेखांमध्ये शोध घेऊन एक महिन्यात माहिती द्यावी व तसा अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु अद्यापही माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता यानी दि. १३/६/२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. अभिलेखात कागदपत्रांचा शोध घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अद्यापही सादर केलेला नाही. तो त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. एच. पी. निकम व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. सुरेश द. जाधव यांनी दि. १५/११/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखाचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन प्राप्त करुन घ्याव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सुनिता अनिल चव्हाण
प्लॉट नं.३४, इडन पार्क, ओम गणेश अपार्टमेंटमागे,
सर्किट हाऊसजवळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, न्यू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज,
लाट, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३७ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर
प्रतिनिधी श्री.एस.ए.गिरी

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, न्यू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, लाट, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर कु.एस.एस.भोजे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

लाट एज्युकेशन सोसायटी, लाट, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर या संस्थेमध्ये लिपिक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेतील सर्व उमेदवारांच्या उत्तरपत्रिकेच्या प्रती व गुणपत्रिकेची प्रत परीक्षकांच्या स्वाक्षरीसह मागितली होती, ती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्रीमती सुनिता अनिल चव्हाण यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली असून निवड प्रक्रिया चुकीची व संशयास्पद असल्याचा आक्षेप नोंदविला आहे.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती मुख्याध्यापकांच्या कक्षेतील नसून संस्थेच्या अखत्यारीतील होती. संस्थेकडून मागवून ती दिली. परंतु प्रत्येक कागदपत्रावर सहीशिक्का नसल्याची त्यांची तक्रार असल्यामुळे अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार एकत्रित गुणपत्रिकेची माहिती पुन्हा पुरविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, न्यू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, लाट, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर कु.एस.एस.भोजे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. सार्वजनिक सेवकाची भरती असल्यास परीक्षा प्रक्रिया पारदर्शक असण्याच्या दृष्टीने सर्व उत्तरपत्रिका कोणालाही अवलोकनासाठी उपलब्ध ठेवणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार आवश्यक आहे. मात्र त्यात

परीक्षकांची स्वाक्षरी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे ओळख पटेल अशा कागदपत्रांच्या प्रती देता कामा नयेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२०११**